Review Of Research
ISSN 2249-894X

Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 5 | Issue - 2 | Nov - 2015

# साहित्य आणि समाज

प्रा. डॉ. पांडुरंग एकनाथ शिवशरण
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, तुळजापुर,
जि. उस्मानाबाद (महा.)

**प्रास्ताविक :**

साहित्य आणि समाज यांचा अनुबंध परंपरेपासूनचा आहे. साहित्य आणि समाज या परस्परावलंबी दोन बाजू आहेत. समाज हा साहित्याच्या निर्मितीचा मुलस्त्रोत असून समाज आणि साहित्य यांना जोडणारा सेतू म्हणजे लेखक होय. साहित्यातून त्या - त्या काळातील मुल्यकल्पना, त्या काळाचे वाङ्मयीन पर्यावरण आदि घटकांचे चित्रण साहित्यिक अत्यंत संवेदनशील भूमिकेतून साकारत असतात. साहित्यकृतीतून आविर्भूत होणारे घटक हे स्थिर स्वरुपाचे नसून काळानुरुप बदलत जाणारे असल्याचे दिसून येते, म्हणजेच साहित्यकृती या सामाजिक जीवनाचे त्या- त्या काळातील चित्रण लेखकाच्या निर्मितीतील एक महत्वाचा घटक होय.




लेखक वेगवेगळया प्रयोजनातून साहित्यकृतीला पसरवित असतो. लेखकाच्या प्रतिभासंपन्नतेतून अभिव्यक्त झालेली साहित्यकृती जीवनाच्या विविधांगांना साकारताना, सामाजिक जीवनाचे संदर्भ घेऊन अविष्कृत होत असते. साहित्यकृती या कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र अशा वेगवेगळया साहित्यप्रकारांतून सामाजिक जीवनाला कालखंडानुरुप साकारित आलेल्या आहेत. तसेच वेगवेगळया काळात निर्माण झालेल्या साहित्यकृती वैदिक, ऐतिहासिक, पौराणिक तसेच वर्तमानकाळातील सामाजिक जीवनाला आधोरेखित करतात. विविध काळातील वैविध्यपूर्ण समाजजीवन, वेगवेगळया समस्या, रुढी, परंपरा, स्त्री-पुरुष संबंध, अंधश्रध्दा, व्यवसाय, एकत्र कुटूंब पद्धती, वर्णव्यवस्था, अस्पृश्यता, बेकारी, शोषण, शहरी जीवन, शेतकरी जीवन, विवाह पद्धती अशा वेगवेगळया अंगांनी साकार होत आलेला आहे. साहित्य आकादमी पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्यकृतीतून अशा वैविध्यपूर्ण सामाजिक जीवनाचे चित्रण अतिशय प्रत्ययकारितेने झालेले पहावयास मिळाते. हे सामजिक जीवनाचे चित्रण त्या त्या काळातील वास्तवपूर्ण जीवनाला आणि लेखकांच्या अनुभवसंपन्नतेला केंद्रीत करते. लेखकांनी आपल्या प्रतिभाशक्तीने उभारलेल्या या कथात्मक साहित्यकृती त्या त्या काळातील समाजजीवनाचे वैविध्यपूर्ण आणि वास्तवपूर्ण चित्र घेऊन साकारत असल्यामुळेच सिद्ध करतात. म्हणूनच त्या साहित्य-अकादमी पुरस्कार पात्र ठरल्याचे दिसून येते. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्यकृतीतून अभिव्यक्त झालेल्या वैविध्यपूर्ण आणि वैशिष्टयपूर्ण सामाजिक जीवनाचे विस्तृत विवेचन करता येईल.

**'लेखक'**

'लेखक' हा समाजजीवनाचाच एक घटक असतो. सर्वसामान्यांच्या बरोबरीनेच तोही जीवन जगत असताना आलेल्या अनुभवांना तो आपल्या प्रतिभाशक्तीद्वारे शब्दबद्ध करतो आणि तेंव्हाच सहित्यकृतीचा जन्म होत असतो. एकंदरीत समाजातील विविध घडामोडींचा साक्षीदार असणारा लेखक त्या-त्या घटना, प्रसंगाना कल्पकतेच्या साह्याने साहित्यकृतीच्या साच्यात बंदिस्त करतो. म्हणजे समाजाचे प्रतिबिंबच साहित्यकृतीत उमटत असते. साहित्यकृती, समाज आणि लेखक यांच्या अनुबंधाविषयी सांगताना डॉ.नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात की, "विविध सामाजिक संस्थांच्या आणि समाजातील विविध व्यक्तिंच्या जगण्यामधून 'सामाजिकता' नावाचे काहीतरी अमूर्त असणारे, तरीही प्रत्येक ठिकाणी जाणवणारे तत्व निर्माण होते. संस्कृतीही निर्माण होते. या समाजामध्ये, सामाजिकतेमध्ये, संस्कृतीमध्ये आणि या सर्वांना पायाभूत असणाऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये आपण सारे जसे राहतो, त्याचप्रमाणे लेखक, कवी, चित्रकार इ. सारे प्रतिभावंत आणि समाजचिंत

राहतात. स्वाभाविकपणेच या सामाजिकतेचा परिणाम त्याच्यावर होत असतो, किंबहुना असे म्हणता येईल की, या समाजिकतेच्या मुशीतून त्यांचा जन्म झालेला असतो आणि ही सामाजिकतेची मूसच त्याची जडण-घडण करीत असते. म्हणूनच साहित्याच्या अत्यंत जवळचा आणि विविध रुपातील अनुबंध निर्माण होतो, तो समाजाशीच." नागनाथ कोत्तापल्ले यांनी सामाजिकता आणि लेखक यांच्या अनुबंधांची संकल्पना स्पष्ट करताना लेखक हा सर्वसामान्यांप्रमाणेच मूलभूत आणि पायाभूत गरजांची पूर्तता करतच आपल्या साहित्यकृती समाजशील कसा अनुबंध निर्माण करतात ते स्पष्ट केले आहे.

साहित्यकृती ह्या सामाजिक जीवनाच्या परिघातच जन्माला येत असतात. समाजजीवनाच्या विकासाबरोबरच साहित्यकला विकसित होत असतात. सामाजिक जीवनातील परिवर्तनाचे पडसाद साहित्यकृतीत पडून ती त्या-त्या काळाचे प्रतिनिधीत्व करीत असते. समाज आणि साहित्य यांच्यातील महत्वाचा दुवा म्हणजे लेखकाचे व्यक्तित्व. लेखकाच्या व्यक्तित्वातूनच साहित्यात समाजचित्रण येत असते. म्हणूनच साहित्य आणि समाज हे परस्परपूरक घटक असल्याचे मान्य करावे लागते. त्यामुळे या घटकांना काळाबरोबर प्रवाही ठेवणारे लेखकाचे व्यक्तित्वही विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. लेखकाच्या व्यक्तित्वाची जडण-घडण तत्कालीन सामाजिक परिस्थितीतच होत असते. या सामाजिक जीवनाच्या चाकोरीत जीवन जगत असताना लेखकाच्या सभोवतालचा समाज, समाजव्यवस्था, सामाजिक मूल्ये, समाजाचे आचार-विचार, रुढी, परंपरा, नीतिकल्पना, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थिती आदि घटकांच्या मूशीतून लेखकाच्या प्रतिभेची चमक पहावयास मिळते. लेखकाच्या साहित्यनिर्मिती प्रक्रियेत त्याच्या सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीचे महत्व किती मोठे आहे हे डॉ. विद्या व्यवहारे अतिशय नेमकेपणाने सांगतात, "साहित्यनिर्मिती ज्या व्यक्तिमनातून होते, ते व्यक्तिमन व्यक्तिचे असले तरी त्याची जडण-घडण समाजातच होत असते. सामाजिक पर्यावरणाचा प्रभाव लेखकाच्या मनावर पडत असतो. लेखकाची व्यक्ती म्हणून होणारी घडण ही त्याच्या सभोवतीच्या पर्यावरणातूनच होत असते. सभोवतालचे संस्कार त्या मनावर होत असतात. समाजात वावरताना त्याला येणाऱ्या अनुभवांचा ठसा त्याच्या मनावर उमटत असतो आणि या मनावर झालेल्या संस्काराचा प्रभाव त्याच्या साहित्यकृतीतून दिसून येतो."

डॉ. विद्या व्यवहारे यांनी लेखकाची निर्मिती त्याच्या व्यक्तित्वातून घडत असली तरी त्याच्या व्यक्तित्वाची जडण-घडण समाजतून कशी होते आणि सामाजिक जीवनातील अनुभवांचा ठसा त्याच्या लेखनावर संस्कारांच्या रुपने कसा उमटतो हे ही सांगितले आहे.

साहित्यिक हा सर्जनशील प्रतिभा लाभलेला एक प्रतिभासंपन्न कलावंतच असतो. सामाजिक जीवनाने त्याला दिलेल्या अनुभवाच्या शिदोरीला तो कलाकृतीच्या साह्याने अभिव्यक्त करीत असतो. सामाजिक जीवन व्यवहार हा साहित्याच्या निर्मितीतील एक प्रधान घटक आहे. समाज आणि त्या समाजाचा जीवनव्यवहार साहित्यकृतीच्या परिपूर्णतेला अभिव्यक्त करतो, तसेच या जीवन व्यवहाराला आधोरेखित करणारी साहित्यकृतीच श्रेष्ठ दर्जाची ठरते. लेखक ज्या समाजात जन्माला आलेला असतो त्या समाजाचे संस्कार त्याच्यावर घडत असतात. त्या समाजातील वैविध्यसंपन्नता लेखकाच्या साहित्यकृतीतून चित्रीत होत असते. नव्हेतर समाजवास्तव लेखकाचा लेखनविषय बनतो. साहित्याच्या निर्मितीत समाज आणि लेखकाच्या व्यक्तिमत्वाची जडण-घडण कशी कारणीभूत ठरते ते डॉ.अंजली सोमण यांच्या शब्दात सांगता येते, त्या म्हणतात,"साहित्याची निर्मिती हस्तिदंती मनोऱ्यात किंवा समाजव्यवहारापासून दूर असलेल्या पोकळीत होत नाही आणि तशी ती झाली तरी या प्रकारचे साहित्य श्रेष्ठ दर्जाचे ठरत नाही. वाङ्मयनिर्मितीची पाळेमुळे समाजव्यवस्थेत रुजलेली असतात. लेखकाचा साहित्यिक पिंड घडवण्याला तत्कालीन सामाजिक परिस्थिती, त्या काळात प्रभावी असणाऱ्या विचारप्रणाली आणि त्या विशिष्ट भाषेतील वाङ्मयीन व शैलीविषयक परंपरा मोठया प्रमाणात कारणीभूत असतात." डॉ.अंजली समोण यांनी साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेत व तिच्या श्रेष्ठत्वात समाज व्यवहार आणि लेखकाच्या घडणीत वाङ्मयीन व शैलीविषयक परंपरा कशा प्रेरक ठरतात ते ठळकपणे सांगितले आहे.

मराठी साहित्याच्या प्रवाहात सामाजिक जीवनाला अभिव्यक्त करणाऱ्या साहित्यकृतींची एक प्रदिर्घ परंपरा आहे. समकालीन जीवनव्यवहाराबरोबर प्रवाही रहात वर्तमान सामाजिक जीवनाला कलात्मकतेने अविष्कृत करणाऱ्या साहित्यकृती काळाच्या पडद्यावर नावाजलेल्या पहावयास मिळतात, अशा साहित्यकृतीच विविध पुरस्कारांनी सन्मानित केल्या जातात. वि.स.खांडेकर यांची साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त 'ययाति' ही कादंबरी पौराणिक कालखंडातील सामाजिक जीवनाचे संदर्भ अतिशय प्रभावीपणे रेखाटताना दिसते. खांडेकरांनी या कादंबरीतून आपले जीवनविषयक तत्वज्ञान अतिशय कलात्मकतेने टिपले आहे. खांडेकरांची जीवनविषयक दृष्टी अतिशय प्रत्ययकारी आणि सखोल स्वरुपाची आहे. खांडेकरांनी पौराणिक विषयाची निवड करुन, वर्तमान सामाजिक परिस्थितीला वास्तववादी भूमिकेतून रेखाटले आहे. या सामाजिक जीवनाचे दर्शन घडविण्यासाठी खांडेकरांनी विविध मानवी मनोवृत्तीचे विवेचन मनोविश्लेष्णवादी भूमिकेतून व्यक्त केलेले आहे.

## साहित्य आणि समाज

भोवतालच्या जीवनाशी एकरुप होऊन खांडेकर नेहमी विचार करतात, सामाजिक जीवनाशी एकरुपत्व सिद्ध करताना घटना, पात्र, प्रसंग, वातावरण, भाषाशैली आदि घटकांचा कलात्मकतेने वापर करतात. खांडेकरांनी मानवी जीवनाचा अगदी सखोल अभ्यास केल्याचे, त्यांच्या लेखनावरुन सहज पटण्याजोगे आहे. विसाव्या शतकातलं जग विनाशाकडे चाललं आहे असं त्यांना वाटतं. बॉम्ब, क्षेपणास्त्र यांसारख्या मानवी संहारक गोष्टींचा शोध लावला पण तो आपल्या मानवर विजय मिळवू शकला नाही. या ठिकाणी त्यांना संतापी, शिघ्रक्रोधी, सारासार विचार न करता शापवाणी उच्चारणारा, आपल्या मुलीच्या अंधप्रेमाने विवेक विसरणारा, छोटया उद्दीष्टांसाठी आचारशक्ती वापरणारा, दैत्याचे गुरु शुक्राचार्य प्रतिक वाटतात. मानवी संहारक शक्तीचा मुकाबला मंगल साधनेतूनच करता येतो, यातून त्यांनी कथाची योजना केली आहे. वर्तमान काळातील समाज भोगवादाच्या अधिकाधिक आहारी जात आहे. या समाजाचं एक प्रतिनिधीत्व रुप, एक प्रतिक म्हणून 'ययाति' येतो. भोगवादापासून दूर जाता येते यासाठी मानवसेवा भोगापासून दूर राहून उदात्त प्रिती करता येते. सुख-दुःखाच्या सिमा ओलांडता येतात, या

आदर्शवादी मुल्यांच्या जतनासाठी कचाचे व्यक्तिमत्व उपयोगी आहे. देवयानी कचाच्या प्रेमात पडते पण तो तिच्यावर मनाने उदात्त प्रेम करतो. भोगाची अपेक्षा त्याला नसते.

श्री.ना.पेंडसे यांनी आपल्या 'रथचक्र' या कादंबरीतून सामाजिक जीवनापेक्षा प्राधान्याने व्यक्ती व कुटूंब जीवनचित्रणाला महत्व दिले आहे. त्यातही कादंबरी वास्तविक स्वरुपात प्रधान, स्त्रीप्रधान कादंबरी आहे. कौटुंबिक जीवनाला शब्दबध्द करणारे पेंडसे कौटुंबिक, जीवनचित्रणाच्या बाहेर गेलेले दिसून येत नाही. कादंबरीतून साकारलेले भावविश्व कुटूंबाच्या परिघात बंदिस्त असल्याचे दिसून येते. बाहेरच्या विश्वाशी कादंबरी क्वचित प्रसंगीच तादत्म्य पावते. कादंबरीचे आशयसूत्र एका दुर्देवी, अभागी स्त्रीभोवतीच फिरत राहते. म्हणूनच साहजीकच ती समाजजीवनापासून वंचित राहील्याचे जाणवते. 'अभागी स्त्रीजीवनाचे चित्रण' हाच कादंबरीचा केंद्रीत विषय बनून या स्त्रीजीवन चित्रणाच्या अनुषंगाने येणारे सामाजिक विश्व कादंबरीत पहावयास मिळते.

'स्वामी' ही माधवराव पेशव्यांच्या जीवनावर आधारलेली चरित्रात्मक कादंबरी आहे. माधवरावांच्या राजकीय जीवनाचे प्रतिबिंब दोन भागातून वर्णन केलेले आहे. तर शेवटच्या तिसऱ्या भागातून रमा माधव भावसंबंध चित्रित केला आहे. ही ऐतिहासिक व्यक्तिचित्रणात्मक कादंबरी आहे. व्यक्तिचित्रणाचे दर्शन घडविण्याच्या प्रयत्नामुळे प्रस्तुत कादंबरीतून सामाजिक जीवनचित्रन त्रोटक स्वरुपात आल्याचे दिसून येते. कादंबरी प्रामुख्याने शनिवारवाडा आणि पुण्याबाहेरच्या शत्रूबरोबरच्या लढाया यातच कादंबरीचा मोठा भाग खर्ची घातल्याने कादंबरीला सामाजिकतेची बाजू निर्माण न झाल्याचे सांगता येते. या कादंबरीतील चित्रणाविषयी शं. गो.राजवाडे लिहितात, "सामाजिक, धार्मिक जीवनाविषयी लेखकाने फारसे काही लिहिले नाही. त्यामुळे 'स्वामी' भारदारपणात कमी पडली." राजवाडे यांनी कादंबरीतून सामाजिक जीवनचरित्राचा अभाव आल्यानेच, ती फारशी गौरविली गेली नाही, असे मत विविध अभ्यासकांबरोबरच राजवाडे यांनीही नोंदविले आहे.

'व्यक्ति आणि वल्ली' या पु.ल.देशपांडे यांच्या व्यक्तिसंग्रहातून साकारणारे सामाजिक जीवनाचे चित्रण समाजातील विविध सामाजिक वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे असेच आहे. पु.लं. नी आपल्या या व्यक्तिचित्रण संग्रहातून विविध नमून्याच्या व्यक्तिरेखा अतिशय कलात्मकतेने आणि प्रभावीपणे साकार केल्या आहेत. मानवी मनाच्या विसंगतीवर भाष्य करताना, पु.लं. नी त्या व्यक्तिंच्या सभोवतलाच्या सामाजिक वलयावरही तेवढयाच कलात्मकतेने प्रकाश टाकला आहे. सामाजिक नितीमुल्यांची जोपासना करत, आपल्या आयुष्याच्या वाटेवर चालणाऱ्या या व्यक्ति मानवी समाजाच्या विविधात्मकतेच्या अगदी सूक्ष्मतेने परिचय घडवून आणतात. या व्यक्तिचित्रणाबरोबरच प्रदेश, भाषा, संस्कृती, सभ्यता व चिरंतन मुल्यांविषयीची सामाजिक अंगे अगदी स्पष्टपणे पु.लं.च्या लेखनात पहावयास मिळतात.

'नाथा कामत' या व्यक्तिरेखेच्या रुपाने समाजातील वेगवेगळया कौटुंबिक जीवनाचे दर्शन घडते. तसेच मानवी स्वभावातील गुणधर्माचे अनेक नमूने नाथाच्या रुपाने पहावयास मिळतात. समाजात स्त्री वर्गाविषयाचे आकर्षण हा जसा स्थायी स्वभाव आहे त्याचे प्रतिनिधीत्व नाथाच्या रुपाने प्रत्ययास येते. 'अंतू बर्वा' या व्यक्तिरेखेच्या रुपाने कोकण प्रदेशातील सामाजिक जीवनाचे अंतरंग पहावयास मिळते. कोकणच्या प्रदेशात वास्तव्यास असलेल्या सामाजिकतेचे विलोभनिय दर्शन अंतू बर्व्यांच्या रुपाने प्रत्ययास येते. तेथील सामाजिकतेची विविध वलये या व्यक्तिरेखेच्या सभोवताली फिरताना दिसतात. एकूणच पु.लं.देशपांडे यांनी विविध व्यक्ती आणि त्यांच्या वल्ली यांचे चित्रण साकारतानाच, या व्यक्तिरेखेच्या सामाजिकतेची असणारी विविध मूल्ये या व्यक्तिचित्रणसंग्रहातून पहावयास मिळतात.

जी.ए.कुलकर्णी यांनी आपल्या 'काजळमाया' या कथासंग्रहातून अतिशय वैविध्यपूर्ण कथा साकारल्या आहेत. मानवी जीवनाच्या समग्रतेचे विशाल दर्शन घडविले आहेत. मानवी जीवनाचा मोठा पट साकारणे हे कथांची प्रमुख वैशिष्टये आहेत. या वैशिष्टयांच्या अनुषंगाने साकारणाऱ्या जी. एं. च्या 'काजळमाया' कथा संग्रहातून साकारण्याचा कथा मानवी समाजाचे विविधांगी दर्शन घडवितात. सामाजिक जीवनाचे दर्शन घडविण्यात जी.एं. च्या कथा साऱ्याच परिसीमा ओलांडून कशा पुढे गेल्या आहेत, तसेच या कथांनी सामाजिकतेचे वास्तविक आणि यथार्थ दर्शन घडवितानाच मराठी साहित्याला सामाजिक जीवनाच्या पडलेल्या मर्यादाही दाखवून कशा दिल्या हे डॉ.द.भि.कुलकर्णी लिहितात, "जी.ए. च्या कथासृष्टीने समकालीन मराठी साहित्याच्या संदर्भात आणखी एक मोलाची कामगिरी केली. त्यांनी साहित्यकृतीतील सामाजिक आशयाची मर्यादा दाखवून दिली. जी. एं. नी दु:खी, दरिद्री, भाबडया, निम्नमध्यमवर्गाची व त्या खालोखाल वनवासी ग्रामीण जीवनाची तपशीलवार रुपे आपल्या कथात रेखाटली ; जुन्या वळणाच्या शोषिक स्त्रीचा गौरव आणि नव्या मुक्त स्त्रीचा अधिक्षेप सुचित नियतीवादाचा आणि अज्ञेयवादाचा निराशापूर्ण गौरव केला." डॉ.कुलकर्णी यांनी जी.एं.च्या कथा मानवी समाजाचे वैविध्यपूर्ण जीवन कोणकोणत्या रुपात साकारतात ते अतिशय प्रत्ययकारितेने सांगितले आहे.

मानवी समाजाच्या मुलभूततेला स्पर्श करणाऱ्या जी. एं.च्या कथा मराठी साहित्याच्या सामाजिकतेचे विलाोभनिय आणि प्रतिकात्मक दर्शन घडवितात. 'प्रदिक्षिणा' या कथेतून 'शांताक्का' या स्त्रीच्या जीवनाला जी.एं.नी अतिशय प्रभाविपणे साकारले आहे. भारतीय समाजातील स्त्रीयांच्या शोकात्मकतेचे हे चित्रण वाचकांना विचार प्रवृत्त करणारे असेच आहे. "आणखी एक सांगते, त्यानंतर माझ्या आयुष्याला पुरुषाचा स्पर्श झाला नाही. गेल्या तीस वर्षात तुझ्या वडीलांनी मला हात लावला नाही. लग्नाआधी मी पत्नी झाले आणि लग्नानंतर कुवार राहिले." दादासाहेबांनी शांताक्काच्या आयुष्याला कसे जगण्यायोग्य केले होते ते पहावयास मिळते.

भारतीय समाजजीवनातील स्त्रीयांच्या वाटेला येणाऱ्या दु:खाचे चित्रण जी.एं.च्या 'शेवटचे हिरवे पान' या कथेतूनही पहावयास मिळते. जवळच्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यूमुळे निर्माण झालेल्या दु:खाचे गडद चित्र या कथेत पहावयास मिळते. "हे बघ, जे होतं ते माणसाकडनं होत नाही, आपल्या कपाळावरच्या रेघोटयांमुळं होतं." मानवी समाजात घटनाक्रमाचे पूर्वनियोजन नियतीनेच निश्चित केल्याचे पहावयास मिळते. जी.ए.यांच्या काही कथा समाजातील रीतीरिवाज, चाली, रुढी, परंपरा, श्रध्दा, अंधश्रद्धांवर प्रकाश टाकतात. त्यांच्या 'वंश' कथेतील करेव्वाला सगळीकडून 'वांझोटी' म्हणून हिणवले गेल्यावर सगळीकडून उपहासाचे शब्द ऐकून शेवटी मूल होण्यासाठी तिला अघोरी उपाय करावे लागतात.

"कारण असल्या ठिकाणी रात्र कशी एकदम एखादे ओझे टाकल्याप्रमाणे अंगावर पडते याची तिला कल्पना होती. शिवाय अंधारात एकटे सापडल्यावर तो कसा हजारो अदृश्य बोटे असल्याप्रमाणे अंगाला हळूहळू लागतो. याचाही तिला अनुभव आला होता." जी.ए. यांनी स्पर्शप्रतीमा व्यक्त करुन इंद्रीय संवेदनेंची प्रतिमा साकार केली आहे.

दैन्य आणि दारिद्रयात आपल्या कुटुंबाला सावरण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रीयांच्या जगण्याची धडपड जी.ए. यांच्या कसाब, भोवरा अशा काही कथातून प्रत्ययकारीतेने साकार झाल्याचे पहावयास मिळते. 'भोवरा' कथेतील नमुताई तिच्या कुटूंबातील दारिद्र्य आणि भावंडाच्या आयुष्याची होणारी परवड पाहून एका बिजवराशी लग्न करुन स्वत:च्या जीवनाचे बलिदान देते. "भोवऱ्याची गती कमी होत रंग स्पष्ट दिसू लागले होते, तोच ती पुन्हा वाढली. दिसू लागलेले रंग पुन्हा मिसळून गेले. वेडे कोण ? शांतू की नमूताई ! पण नमूताईमधली कोणती ? ही का ती ? का तिसरी, चौथी ?" जी.ए. यांनी आपल्या कथातून मानवी जीवनाच्या विविधतेचा शोध घेतल्याचे पहावयास मिळते एकूणच "जी.ए. यांनी 'काजळमाया' तील कथेतून डॉस्टोव्हस्की या त्यांच्या आवडत्या लेखकाप्रमाणे मानवी जीवनाच्या अंतिम वास्तवाविषयी चिंतन केल्याचे दिसून येते." [१९] असे प्रा.मच्छिंद्र नागरी यांनी त्यांच्या कथेविषयी मांडलेले चिंतन अतिशय योग्य वाटते.

'स्मरणगाथा' या आत्मचरित्रात्मक कादंबरीतून गो.नी.दांडेकर यांनी आपल्या जीवनाचा प्रवास रेखाटला आहे. आपल्या लहानपणापासून ते तारुण्यापर्यंतच्या भटकंतीत त्यांच्या वाटयाला आलेल्या जीवनाचे प्रत्यकारी चित्र रेखाटले आहे. लहानपणात दांडेकरांच्या आयुष्यात घडलेल्या घटना-प्रसंगाचे ठळक चित्रण पहावयास मिळते. समाजात घडणाऱ्या घटनांनी दांडेकरांच्या वृत्ती-प्रवृत्तीवर कसा आघात केला आणि त्यातूनच त्यांची व्यक्तिमत्व कसे घडत गेले ते 'स्मरणगाथे' तून अनुभवास मिळते. इंग्रजी राजवटीत समाजात घडलेल्या घटनांनी दांडेकरांना कसे अस्वस्थ केले ते दांडेकर सांगतात,"सीताबर्डीच्या किल्ल्यावरुन भगवं निशाण खाली उतरवून तिथं युनिक - जॅक डौलानं फडकत ठेवलेला, ही घटना माझ्या मनात काटयासारखी सलत असे." सामाजिक जीवनात घडणाऱ्या घटना-प्रसंगातून लेखकांनी कशा प्रेरणा घेतल्या ते प्रत्ययास येते.

'झाडाझडती' या विश्र्वास पाटलांच्या कादंबरीतून धरणग्रस्त सामाजाची व्यथा, करुण्यपूर्णतेने टिपली आहे. साहित्य आणि समाज या दोन परस्परावलंबी बाजू असल्याने, साहित्यातून सामाजिक जीवनाचे चित्रण घडतेच घडते. समाजजीवन आणि समाजमन हा साहित्याचा मूख्य विषय आणि आशय असतो. 'झाडाझडती' ही कादंबरीही अशा 'धरणग्रस्त' समाजजीवनाला अधोरेखित करते. 'धरणग्रस्त' लोकांच्या एकत्र समुह जीवनाची करुण महागाथा म्हणजे 'झाडाझडती' ही कादंबरी होय. मानवी समाजाचे, त्यांच्या उद्धवस्तेचे एक कलात्मक ललित रुप म्हणजे 'झाडाझडती' कादंबरीतील समाजजीवन होय. मानवी समाजाचा एक विशाल पट प्रस्तुत कादंबरीतून अतिशय प्रभावीपणे व्यक्त झाला आहे, या कादंबरीतून अभिव्यक्त झालेल्या चित्रणाविषयी डॉ.धोंडिबा कवडे लिहितात, "लेखकाने या कादंबरीत प्रदीर्घ विशालपट मांडून, विविध माणसांच्या दु:खवेदना आणि झुंजीच्या निमित्ताने जटिल होत जाणाऱ्या मानविश्र्वाचा धोंडोळा घेतला आहे. तो इतका व्यापक आहे, तितकाच सखोलही आहे. त्यातील संघर्षाचे रुप अनेककेंद्री, विविधमुखी असे आहे. त्यात जीवनाच्या दीर्घ अशा प्रवासाचे छाती दुभंग करणारे रुप असल्याचे दिसून येते. कादंबरीचे सात भाग कल्पून त्यातून जांभळी गावाच्या धरणामुळे उठणे आणि पुनर्वसन होता होता तुकडया तुकडयांनी तुटत जाणे दिसते. त्यात विविध स्तरावरील विविध जाती-जमातींची विविध वयोगटातील, विविध मनोवृत्तीची माणसे आहेत. त्यांच्या व्यापद, उदिमांचे, उद्योगधंद्याचे, इतडा-पेठांचे जनावरांचे आणि दरी डोंगर पाणथळयांचे सुक्ष्म चित्रण आहे."

झाडाझडतीत 'जांभळी' धरणात एकूण सात गावे बुडली जातात. या गावगाडयात वेगवेगळया समाजातील लोक वास्तव्यास होते. त्यात रामोशी, महार, कोळी, मराठा, ब्राह्मण अशा वेगवेगळया जाती-जमातींची माणसे आहेत. ही सगळी माणसं आपल्या जाती, धर्माची सामाजिक, नैतिक मुल्ये स्वीकारुन कसे जीवन जगत आहेत आणि प्रसंगी एकत्र येऊन गावावर उद्भवणाऱ्या समस्येला कसे सामोरे जात आहेत हे पहावयास मिळते. इ.स.१९२० साली गांधीजींनी 'खेडयाकडे चला' असा संदेश दिला. भारताची जनता बहुतांश खेडयात राहते. 'ग्रामजीवनाचा विकास हाच खरा भारताचा विकास' हे प्रधान सूत्र ठरले गेले. पण ; स्वातंत्र्यप्राप्तीच्या काही वर्षानंतर खेडयाचा चेहरा-मोहरा बदलला, समाजात विकासाचे पर्व सुरु झालेच नाही. लोकराज्याचं भ्रष्ट रुप खेडया-पाडयांपर्यंत गेलं. समाज आहे त्या स्थितीत कसाबसा जगू लागला. स्वार्थापोटी धरणे बांधली गेली. ग्रामीण समाजजीवनात अनेक समस्या निर्माण झाल्या, याचे चिंतन करायला लावणारे समाजजीवन 'झाडाझडती' मधून पहायला मिळते.

मानवी समाजजीवनाशी अतिशय निकटचे नाते सांगणारी नामदेव कांबळे यांची 'राघववेळ' ही कादंबरी 'मांग' जमातीच्या घडणाऱ्या परिवर्तनाची जाणीव करुन देणारी कादंबरी आहे. दलित म्हणून गणल्या गेलेल्या समाजाची करुण कहाणी नामदेव कांबळे यांनी आपल्या 'राघववेळ' मधून कथन केली आहे. आंबेडकरवादी विचारांनी प्रभावीत झालेल्या दलित साहित्याच्या प्रवाहातील आजच्या पिढीचे प्रतिनिधीत्व करणारे नामदेव कांबळे आपल्या समाजाला त्या समाजातील प्रश्नोपप्रश्नांना, त्यांच्या दैन्यावस्थेला अतिशय प्रभावीपणे चित्रित केलेले आहेत. नामदेव कांबळे यांनी आपल्या सामाजिक वास्तवाला आपल्या कादंबरीतून कालात्मकतेने चित्रित केलेले आहेत. 'लेखक' हा समाजाचा एक अविभाज्य घटक असल्याने, समाजात घडणाऱ्या घटना-प्रसंगांना आणि त्या भोवतालच्या वास्तविक परिस्थितीला साकार करीत असतो. कारण-"माणूस स्वत:च एक वास्तव आहे आणि तो वास्तवाने वेढलेलाही आहे. ज्या वास्तवाने तो वेढलेला आहे त्या वास्तवाचा तो भाग आहे. हे वास्तव मुळात तीन प्रकारचे आहेत. पहिले वास्तव प्राकृतिक वास्तव आहे. हे प्राकृतिक वास्तव जमीन, पाणी, हवा, अग्नी, धातू असे नऊही आहे. वनस्पती जगातील सजीवही आहे. प्राणी, पशुपक्षी असे संचेतनही आहे. माणूस स्वत:च या वास्तवाचा भाग आहे. आपल्या गर्जांच्या पूर्तीसाठी तो हे वास्तव वापरीत असतो. या वास्तवाचा वापर करताना माणूस वास्तवावर संस्कार करुन त्याचे रुप बदलतो." [२६] वरील मनातून

वास्तव हे माणसाच्या जीवनाशी कसे एकरुप झालेले असते ते करुंदकरांनी अत्यंत योग्यतेने मांडले आहे. वास्तवावर संस्कार करुन लेखक आपल्या लेखनीद्वारे सिद्ध करीत असतो याचा प्रत्यय नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' या कादंबरीतून येतो.

लेखक ज्या जातीत जन्मलेले आहेत त्या मांग जातीत घडणाऱ्या परिवर्तनाची जाणीव कांबळे यांनी प्रस्तुत कादंबरीतून करुन दिली आहे. 'वसारी' नावाच्या गावातील मांग समाजाच्या जीवनाची ही भेदक कथा आहे. या गावापुरतीच ती मर्यादित राहत नाही तर त्या गावातील समाजजीवनाचे गावगाडयाचे वास्तव रुप पूर्णपणे उलगडून दाखवते. ही कादंबरी विचारात घेताना, काही ठराविक गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. मांग समाजाला केंद्रस्थानी ठेवून लेखक एक संपूर्ण गाव आणि गवाचे सामूहिक जीवन उभे करण्याचा प्रयत्न करतात. साधारणतः परस्परांवर अवलंबून असलेले आणि ज्याला काही एक परंपरा आहे असे जगणे, जेंव्हा या दोन्ही घटकासह येते, तेंव्हा सामुहिक जगण्याचे चित्रण साहित्यकृतीमध्ये येते. अशा कलाकृतीत व्यक्तीचे चित्रण तर होतेच पण एकूण समाजाचेच सामुहिक जीवन साकारत जाते.

'ताम्रपट' ही रंगनाथ पठारे यांची विस्तृत कादंबरी मानवी समाजजीवनाचा विशालपट अगदी विस्तृतपणाने साकार करते. आधुनिक काळातील मानवी समाजाचे प्रत्ययकारी आणि विलोभनीय दर्शन प्रस्तूत कादंबरीतून लेखकांनी घडविले आहे. आधुनिक कालखंडातील समाजजीवनातील गुंतागुंत, राजकीय, सामाजिक, धार्मिक, वैचारिक अशा अनेक स्तरासह आणि त्यांच्या बदलत्या रुपासह कवेत घेण्याचा प्रयत्न करणारी ही कादंबरी आहे. या समाजदर्शनाला मानवी वृत्ती-प्रवृत्तीच्या नातेसंबंधाच्या विविधतेची जोड आहे. इतके व्यापक जीवनदर्शन हे या कादंबरीचे सामर्थ्य आहे.

'ताम्रपट' मध्ये समाजाच्या काही स्तराचे चित्रण आलेले आहे. धरणग्रस्ताच्या जीवनाचे वर्णनही केलेले आहे. नाना विस्थापितांच्या प्रश्नासाठी लढा देतात, उपोषण करतात, पण मतलबी सरकार याकडे दुर्लक्ष करते. विस्थापित हे विस्थापितच राहतात. अशा सामाजिक प्रश्नांना आधोरेखित करतानाच रंगनाथ पठारे समाजातील कर्ता आणि त्याच्या पाठीशी असणारे लोक धर्म, जात-पात विसरुन सामाजिक एकतेसाठी एकत्र येतात. स्वातंत्र्य लढयात नाना शिरुर बरोबर आदिवासी गोडे पाटील, मराठा तुकाराम भोईटे, गुलबा नाईक, रामुशी भिमाबा नाईक, लाहानू कोयम, दगडू भिल्ल, मारुती भिल्ल, गोविंदभाई तामसदे, कोष्टी समाजाची आवडाई, शांता आजी, नारायण सोनवणे, ही सर्व आठरापगड जातीतील मंडळी नानांच्या शब्दाखातर देशासाठी प्राणही आर्पण करायला तयार असतात, असा हा स्वातंत्र्य लढयातला समूह आणि याच्या रुपाने समाजात असणारे एकरुपत्व सिद्ध होते.

'तणकट' या कादंबरीतून राज गवस यांनी दलित आणि सवर्ण समाजजीवनाला केंद्रस्थानी ठेवून या समाजजीवनातील घटना-प्रसंगांना भेदक स्वरुपात चितारले आहे. खेडयातील दलितावर होणारा सवर्णांचा अत्याचार आणि सवर्ण समाजातूनच दलितांना लुटणारे लुटारु यांचे हृदयस्पर्शी वर्णन लेखकांनी प्रस्तुत कादंबरीत केले आहे. 'तणकट' ही कादंबरी आपल्या सांस्कृतिक जीवनावरील एका महत्वपूर्ण प्रश्नावर प्रकाश टाकते. गाव आणि गावकूस यातील ताण-तणाव, क्रिया-प्रतिक्रिया, साद-पडसाद अशा अनेकविध स्वरुपातून ग्रामीण आणि दलित सामाजिक जीवनाचे बारकावे टिपत कादंबरीतून सामाजिक जीवन चित्रित होते. या वाटेने प्रवाही होणारे या कादंबरीचे कथानक केवळ वास्तववादाचे दर्शन घडवून थांबत नाही तर आत्मपरिक्षण आणि चिंतनाच्या वाटेने हे जीवनदर्शन अधिक व्यापक आणि सखोल होते.

## सारांश :-

अशाप्रकारे शेवटी सारांशरुपाने सांगता येते की, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्यकृतीतून साकारणारे समाजजीवन त्या त्या काळातील सामाजिक जीवनाचे विविध बारकावे अगदी प्रभावीपणे मांडीत जाते. लेखकांनी आपल्या साहित्यकृतीतून समाजजीवनातील विविधांगांना साकारतानाच, सामाजिक, नैतिक मुल्यांचा होत जाणारा ऱ्हासही विचारात घेतला आहे. प्रस्तुत साहित्यकृतीतून लेखकांनी समकालीन सामाजिक जीवनाचा उभा आडवा छेद घेताना, मानवी समाज कशा पद्धतीने विस्थापित झाला आहे हे सांगितले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात एकूणच समाजजीवनाकडे बघण्याची दृष्टी बदलली. समाज बोलू लागले. वाङ्मयाने यापूर्वी स्पर्श न केलेल्या सामाजिक जीवनाचे चित्रण, सामान्य शोषित आणि तळागाळातील माणसाच्या भावभावना, जाणीवा, व्यथा, वेदना या कलाकृतीच्या रुपाने मुखर झाल्या. मानवी समाज जीवनाला या कलाकृतींनी अक्षरशः शब्दरुपाने जीवंत केले आणि म्हणूनच या साहित्यकृतीचे मोल पुरस्काराचे रुपाने सिद्ध झ ााल्याचे मान्य करावेच लागते. एकूण साहित्यअकादमीचा पुरस्कार मिळणारी कलाकृती ही अशी मानवी जीवनाशी व समाजजीवनाशी एकरुप होणारी अशीच असते.

## निष्कर्ष

पुरस्कारप्राप्त कथात्मक कलाकृतीतून साकारलेल्या समाजजीवनाचे विवेचन प्रस्तुत प्रकरणात केले आहे. या कलाकृतीतून साकारलेल्या समाजजीवनाचा विचार करुन साहित्य आणि समाज यांचा सहसंबंध स्पष्ट केला आहे. तसेच या कलाकृतीतून साकारणाऱ्या सामाजिक जीवनचित्रणाला पौराणिक, ऐतिहासिक, प्रादेशिक, दलित, ग्रामीण अशी वेगवेगळी पार्श्वभूमी कशी निर्माण झाली आहे ते लक्षात घेतले आहे.

- वि.स.खांडेकराच्या 'ययाति' कादंबरीतून साकारणारे सामाजिक जीवन पौराणिक काळातील जीवनपध्दती, समाज संस्कृती यांचे परिणामकारक दर्शन घडविते.

- रणजित देसाई यांच्या 'स्वामी' कादंबरीतून अभिव्यक्त होणारे समाजजीवन ऐतिहासिक जीवनातील सामाजिक मूल्ये, रुढी, परंपराचे दर्शन घडविते तसेच ऐतिहासिक स्त्री जीवनाला आणि त्यांच्या सामाजिक आचरणालाही स्पष्ट करते.
- या कथात्मक कलाकृतीतून साकारणारे समाजजीवन वेगवेगळया सामाजिक जीवनातील वैविध्यतेचे प्रभावी दर्शन घडविण्याबरोबरच लेखकांच्या सामाजिक पार्श्वभूमीचेही आकलन करुन देते.
- या कथात्मक कलाकृतीतील काही कलाकृती समाजातील अंधश्रध्दा, वेगवेगळया समाजाचे व्यवसाय त्या - त्या समाजातील कौटुंबीक जीवन, प्रसंगी विद्रोह करुन जीवन जगणाऱ्या स्त्रीयांचे समाजजीवन स्पष्ट होते.
- समाजातील एकत्र कुटुंब पध्दती, पती-पत्नीतील नाते संबंध, समाजातील प्रेमसंबंध, समाजात स्त्रीयांना असणारे स्थान सामाजिक जीवन चित्रणाच्या अनुषंगाने स्पष्ट होते.

### संदर्भ

१) डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, साहित्य आणि समाज प्रा.गो.मा.पवार गौरवग्रंथ, प्रस्तावना - प्रतिमा प्रकाशन पुण, पृ.१९.
२) डॉ.विद्या व्यवहारे, साहित्य विमर्श, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.जानेवारी २००३, पृ.७०.
३) डॉ.अंजली सोमण, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९/९, पृ.१८,१९.
४) वि.स.खांडेकर, ययाति, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे एकतिसावी, आवृत्ती, सप्टें.२०११, पृ.२१.
५) वि.स.खांडेकर, उ.नि.पृ.२४
६) वि.स.खांडेकर, उ.नि.पृ.१५१.
७) वि.स.खांडेकर, उ.नि.पार्श्वभूमी, पृ.४१०.
८) श्री.ना.पेंडसे, रथचक्र,मौज प्रकाशन गृह, मुंबई, पृ.१७.
९) डॉ.द.भि.कुलकर्णी, कादंबरी : स्वरुप व समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ.२००३, पृ.क्र.७८.
१०) श.यो.राजवाडे, स्वामी एक शोध, प्रस्तावना, संपा.डॉ.मीरा घाडगे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ.२२